राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजूरी देण्याबाबत सन २०१९-२०-जि. सिंधुदूर्ग

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: ग्राक्षेवि -२०१९/प्र.क्र.४२/का.९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २० जुन, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१५/प्र.क्र.७७/ का.९, दि.२२ सप्टेंबर, २०१५.
२) शासन पूरकपत्र,अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.६/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७/प्र.क्र.३८/ का.९, दि. ३१ मार्च, २०१७.
४) शासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१७/प्र.क्र.३८(भाग-२)/ का.९, दि. २८ एप्रिल, २०१७.
५) शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग क्र. संकीर्ण-१०.१७//प्र.क्र.६४/ अर्थोपाय, दि.२१ सप्टेंबर,२०१७.
६) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३. दिनांक ०१ एप्रिल, २०१९
७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि. प. सिंधुदूर्ग यांचे जाक्र. ग्रापंखा /निधी/ १२६७/२०१९ दि. १४/०१/२०१९ चे पत्र व सहपत्र

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/ पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमुहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सन २०१९-२० या वर्षासाठी ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये, दि.२२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (क) (iii) च्या पुढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार संदर्भ क्र.३ येथील परिशिष्ट-अ मधील अ.क्र.८नुसार जिल्हा सिंधुदूर्ग, तालुका कणकवली, खारेपाटण ग्रामपंचायत करिता एकूण ४ कामानां प्रशासकीय मान्यता देऊन एकूण रुपये ४० लक्ष इतका अनुदान वितरीत करण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र.४ च्या शासन शुध्दीपत्रकातील अ.क्र. ८ अन्वये कामात बदल करण्यात आले होते. आता संदर्भ क्र. ५ च्या पत्र व सहपत्रानुसार ३१ मार्च, २०१८ पर्यंत मंजूर कामे पूर्ण करणे आवश्यक होते. पंरतू सदर कामे नैर्सगिक कारणास्तव विहीत कालावधीत पूर्ण न झाल्याने सदर कामापोटी मंजूर रुपये ४० लक्ष इतकी रक्कम अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतीना सहायक अनुदान (२२३५ बी ०८५) या लेखाशिर्षाखाली परत भरण्यात आलेली आहे,असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि. प. सिंधुदूर्ग

यांनी कळविले आहे. सदर काम प्रगतीपथावर असल्याने पुनश्च: सन २०१९-२० च्या अनुदानातून जिल्हा सिंधुदूर्ग, तालुका कणकवली, खारेपाटण ग्रामपंचायतीच्या प्रस्तावांना मंजूरी देऊन निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील ग्रामीण क्षेत्र विकास योजनेकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु.५१,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक्कावन कोटी फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी, संदर्भ क्र.६ चे वित्त विभाग शासन परिपत्रक दि.०१ एप्रिल,२०१९ अन्वये माहे एप्रिल ते जुलै या चार महिन्याकरिता रु.१७ कोटी (रुपये सत्तरा कोटी फक्त) एवढा निधी वितरणास मान्यता प्राप्त झाली आहे.सदर उपलब्ध निधीमधून ग्रामपंचायत खारेपाटण, तालुका कणकवली जिल्हा सिंधुदूर्ग यांना या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे **रु.४०,००,०००/- (अक्षरी एकूण रुपये चाळीस लक्ष फक्त)** ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनुदान मंजूर करण्यात येत असून हे अनुदान सिंधुदूर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.

२. उपरोक्त ग्रामपंचायत खारेपाटण अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतीना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी, नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास त्या बदल्यात इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार सिंधुदूर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासन जमा करण्यात यावा. तसेच सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुपूर्द करण्यात यावा.

३. ज्या विवक्षीत प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी खारेपाटण ग्रामपंचायतीनी निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदूर्ग जिल्हा परिषद यांच्याकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर खारेपाटण ग्रामपंचायतीनी प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट -"ब"** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील संबंधित अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींनी हाती घेतलेल्या विकासकामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र. झेड ई-१,२२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, १९८-ग्रामपंचायतींना सहाय्य अनुदान, राज्य योजनांतर्गत योजना, ०१ अल्पसंख्याकांना सहाय्य, (०१) (०१) अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना सहायक अनुदान (कार्यक्रम), (२२३५ बी ०८५) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

५. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ६ येथील वित्त विभागाचे परिपत्रक दिनांक ०१ एप्रिल, २०१९ मधील परिछेद क्र.५ ते १७ येथील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे."

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२०१७१५२१८५१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.06.20 17:16:19 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मंबई,
३) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अ.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र शासन,
५) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
६) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
७) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
११) जिल्हा कोषागार अधिकारी (सिंधुदूर्ग),
१२) अर्थसंकल्प शाखा (का.७), अविवि, मंत्रालय, मुंबई,
१३) निवडनस्ती (कार्यासन-९).

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१९/प्र.क्र.४२/का.९,
दि. २० जुन, २०१९

परिशिष्ट "अ"

अ. क्र.	जिल्हा	तालुका	ग्रामपंचायतीचे नांव	कामाचे नांव	मंजूर निधी (रुपये)
१	सिंधुदूर्ग	**कणकवली**	खारेपाटण	खारे-काजीर्डे रस्ता ते चर्मकारवाडी रस्ता सरंक्षण भिंत बांधणे.	१० लक्ष
				खारे-काजीर्डे रस्ता ते मसजिद रस्ता आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे	५ लक्ष
				खारे-काजीर्डे रस्ता ते चर्मकारवाडी रस्ता खडीकरण डांबरीकरण व मोरी बांधकाम करणे. ग्रा. मा. क्र. ०५ किमी.५५०/० ते००/१.	१५ लक्ष
				खारे-काजीर्डे मुस्लिमवाडी कब्रस्तान पक्के कुंपण बांधणे	१० लक्ष
				एकूण	**४० लक्ष**
				(अक्षरी एकूण रुपये चाळीस लक्ष फक्त)	

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.06.20 17:18:00 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१९/प्र.क्र.४२/का.९,
दि. २० जुन, २०१९

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. **ग्राक्षेवि २०१९/ प्र.क्र.४२/ का.९, दि. २० जुन,२०१९** अन्वये वितरित केलेला रु.   /- (अक्षरी रु.   ) एवढा निधी पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष/ अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधी मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज/अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)
२. मोजणी पुस्तके (Measurement Books)
३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)
४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक, संबंधित ग्रामपंचायत यांची स्वाक्षरी	**मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांची प्रतिस्वाक्षरी**
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****